# जिद्द , चिकाटी , मेहनत या जोरावर यश संपादन करता येते : मा. डॉ. के.एस .चौगुले



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यानी मनामध्ये कोणताही न्युनगंड न बाळगता विविध क्षेत्रामध्ये यश संपादन केले पाहिजे. जिद्द , चिकाटी , मेहनत या जोरावर यश संपादन करता येते या गुणवंत विद्यार्थ्यांनी असेच यश संपादन करून कॉलेजचे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन संस्थापक - अध्यक्ष मा. डॉ. के.एस . चौगुले यानी केले.

`श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी - कोतोली ता. पन्हाळा येथील शिष्यवृत्ती समितीमार्फत शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१९ - २० २० चे धनादेश वितरण प्रसंगी डॉ. के.एस . चौगुले बोलत होते. कॉलेज मधील १ ) वर्षा पुंडलिक पाटील बी. ए. भाग - १ २ श्वेता युवराज पाटील बी. ए. भाग - १ ३ ) प्रमिला शिवाजी चव्हाण बी.एस्सी भाग - १ ४) उदय मारुती पाटील बी. एस्सी. भाग - २५ ) प्रताप निवृत्ती पाटील बी. एस्सी. भाग - २ ६ ) विद्याताई विलास दळवी बी.एस्सी .भाग - २ याना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे कडून प्रत्येकी पाच हजार रुपयाचे धनादेश मिळाले त्याचे वितरण मा. डॉ. के.एस . चौगुले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थित म्हणून संस्था सचिव मा. शिवाजीराव पाटील , संचालक डॉ. अजय चौगुले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत शिष्यवृत्ती समिती प्रमुख श्री. पी.डी . माने यानी केले तर आभार श्री. यु.एन. लाड यानी मानले.

कार्यक्रमास समिती सदस्य व सर्व शिक्षक , कर्मचारी पत्रकार श्री. शिवाजी पाटील , श्री. किरण मस्कर , श्री. संग्राम पाटील , श्री. शशिकांत शेटे उपस्थित होते. फोटो ओळ - श्रीपतराव चौगुले कॉलेज मधील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती चे धनादेश वितरण प्रसंगी संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. के.एस. चौगुले सोबत मा. शिवाजीराव पाटील , डॉ . अजय चौगुले , श्री. पी.डी . माने व यशस्वी विद्यार्थी